राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/प्रशिक्षण/२०२२/ 299e दिनांक : 09 MAY 2022

## परिपत्रक

**तात्काळ/कालमर्यादा दि. १७/०५/२०२२ पर्यंत**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक/उपसचिव,
सर्व शासकीय संस्था / कार्यालये,
पुणे विभाग.

**विषय:- लिपिकवर्गीय कर्मचा-यांसाठी घेण्यात येणा-या विभागीय सेवा प्रवेशोत्तर / पर्यवेक्षीय प्रशिक्षणाबाबत.**

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/प्रशिक्षण/२०२२/१४५, दि.०५/०५/२०२२.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था / कार्यालयातील लिपिकवर्गीय कर्मचा-यांची प्रशिक्षणासाठी (सेवाप्रवेशात्तर व पर्यवेक्षीय) सोबत जोडलेल्या **प्रपत्र अ** मध्ये ज्या कर्मचा-यांचे सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व परीक्षा झालेली नाही त्यांचा तपशील. तसेच **प्रपत्र ब** मध्ये ज्या कर्मचा-यांची पर्यवेक्षीय प्रशिक्षण व परीक्षा झालेली नाही त्यांची माहिती सादर करण्यात यावी.

तसेच **प्रपत्र क** मध्ये सेवाप्रवेशोत्तर/पर्यवेक्षीय परीक्षेस अनुपस्थित राहिले असतील किंवा अनुत्तीर्ण झालेले आहेत, अशा कर्मचा-यांची माहिती सादर करण्यात यावी. उपरोक्त माहिती **Excel Sheet मध्ये DV-TTYogesh या फॉन्टचा वापर करुन दि.१७/०५/२०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत** विभागीय कार्यालयाच्या **est.ropune@gmail.com** या ई-मेल आयडीवर सॉफ्ट कॉपी पाठविण्यात यावी.

तसेच दि.०१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सेवाप्रवेशोत्तर व पर्यवेक्षीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणेसाठी वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक ग्राहय धरणे बाबत शासनाने निश्चित केले आहे. त्यामुळे ज्या कर्मचा-यांची **दि. १ मार्च २०१८ नंतर वयाची ५० वर्षे पूर्ण झालेली नाहीत** अशा कर्मचा-यांची माहिती देखील सोबतच्या प्रपत्रात (अ व ब) सादर करण्यात यावी. पात्र कर्मचा-यांची नावे प्राप्त न झाल्यास त्यांचे सेवाप्रवेशोत्तर/पर्यवेक्षीय प्रशिक्षण व परिक्षेअभावी आश्वासित प्रगती योजनेचे १०/२०/३० चा लाभ देण्यास विलंब झाल्यास किंवा लाभाचा दिनांक पुढे गेल्यास संबधीत संस्था प्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

**सोबत :- प्रपत्र अ, ब व क**

(डॉ. द. व्य. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

## प्रपत्र - अ

### प्रशिक्षण / परीक्षेचे नाव : सेवा प्रवेशोत्तर

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव व कार्यरत आस्थापना | धारण करीत असलेले पद व सदर पदावरील सेवा कालावधी | जन्मतारीख व दिनांक १/०३/२०१८ रोजीचे वय | नियुक्तीचा दिनांक | सेवेचा एकूण कालावधी | मागासवर्गीय असल्यास प्रवर्गाची माहिती | प्रशिक्षणास पूर्वी निवड करण्यात आली होती किंवा कसे? | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

संस्था प्रमुख

---

## प्रपत्र - ब

### प्रशिक्षण / परीक्षेचे नाव : पर्यवेक्षकीय

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव व कार्यरत आस्थापना | धारण करीत असलेले पद व सदर पदावरील सेवा कालावधी | जन्मतारीख व दिनांक १/०३/२०१८ रोजीचे वय | नियुक्तीचा दिनांक | सेवेचा एकूण कालावधी | मागासवर्गीय असल्यास प्रवर्गाची माहिती | प्रशिक्षणास पूर्वी निवड करण्यात आली होती किंवा कसे? | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

संस्था प्रमुख

---

## प्रपत्र — क

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | आस्थापना / कार्यालयाचे नाव | मे २०१९ मधील विभागीय सेवाप्रवेशोत्तर / पर्यवेक्षकीय प्रशिक्षणांस उपस्थित / परीक्षेस अनुपस्थित | विभागीय सेवाप्रवेशोत्तर / पर्यवेक्षकीय परिक्षेत अनुत्तीर्ण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

संस्था प्रमुख